# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सेलिब्रिटी भाऊ कदम उद्या अहिल्यानगर जिल्ह्यात

**पहिल्या टप्प्यात रेनवडी (ता. पारनेर), कासार दुमाला (ता. संगमनेर) तसेच लोणी बु. (ता. राहाता) गावभेट दौरा**

अहिल्यानगर, दि. ०६ जानेवारी २०२६

राज्यातील ग्रामपंचायती अधिक सक्षम, पारदर्शक व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेले **"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान"** हे शासनाचे एक महत्वाकांक्षी अभियान आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी तसेच व्यापक जनजागृती व्हावी, यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसिद्धीवर भर देण्यात येत आहे.

याच अनुषंगाने ग्रामपंचायत स्तरावर लोकसहभाग वाढविणे व अभियानाची उद्दिष्टे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने सुप्रसिद्ध सेलिब्रिटी **भाऊ कदम** हे **दि. ७ जानेवारी २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध गावांना भेट देणार आहेत**. पहिल्या टप्प्यात **महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम भाऊ कदम** हे **रेनवडी (ता. पारनेर), कासार दुमाला (ता. संगमनेर) तसेच लोणी बु. (ता. राहाता)** या ग्रामपंचायतींना भेटी देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा प्रचार व प्रसार करणार आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून **सुशासनयुक्त पंचायत (लोकाभिमुख प्रशासन), सक्षम पंचायत (स्वनिधी, CSR, लोकवर्गणी), जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय**, तसेच **लोकसहभाग व श्रमदानातून लोकचळवळ** प्रभावीपणे राबविणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. ग्रामपंचायती विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून **"सशक्त ग्रामपंचायत – समृद्ध गाव"** ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी हे अभियान अत्यंत महत्वाचे ठरत आहे.

या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व ग्रामस्थांना प्रेरित करण्यासाठी सेलिब्रिटी भाऊ कदम यांच्यामार्फत ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम व विकासकामांना भेटी देण्यात येणार असून, या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधण्यात येणार आहे.

सेलिब्रिटी भाऊ कदम यांच्या उपस्थितीमुळे या अभियानाला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल तसेच ग्रामपंचायत प्रतिनिधी, अधिकारी व नागरिकांमध्ये जनजागृती होण्यास मदत होईल, असा विश्वास **जिल्हा परिषद अहिल्यानगर** यांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित तालुक्यांतील तसेच परिसरातील इतर सर्व ग्रामपंचायतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्यामार्फत करण्यात आले आहे.